ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आणि रोजगारनिर्मिती: एक दृष्टिक्षेप

**रचना सुभाष हांडे[1], प्रा. डॉ. गोरक्षनाथ कचरू सानप[2]**

*[1]संशोधक विद्यार्थीनी, अर्थशास्त्र विभाग व संशोधन केंद्र*
*संगमनेर नगरपालिका कला, दा.ज. मालपाणी वाणिज्य व ब.ना. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर, (स्वायत्त)*
*ता. संगमनेर, जि. अहमदनगर*
*[2]विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग व संशोधन केंद्र*
*संगमनेर नगरपालिका कला, दा.ज. मालपाणी वाणिज्य व ब.ना. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर, (स्वायत्त)*
*ता. संगमनेर, जि. अहमदनगर*
***Corresponding Author:* रचना सुभाष हांडे**

**DOI - 10.5281/zenodo.14880938**

**गोषवारा:**

*भारतात एमएसएमई क्षेत्र सुमारे ११ कोटी लोकांना रोजगार पुरविते तसेच जीडीपी मध्ये या क्षेत्राचे योगदान जवळपास १७ टक्के एवढे आहे. खादीचे कापड, मध यासारख्या असंख्य वस्तू ज्या औद्योगिक उत्पादनासाठी वापरल्या जातात. या सर्वांची निर्मिती एमएसएमई या क्षेत्राकडून केली जाते. असे असताना या महत्वाच्या क्षेत्रास अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. पायाभूत सुविधांचा अभाव, वेळेवर पत पूरवठा न होणे, आधूनिक तंत्रज्ञानाचा अभाव, कुशल मनुष्यबळ उपलब्ध नसणे, विपणनाच्या सुविधाचा अभाव या सारख्या अनेक समस्या या क्षेत्राला भेडसावत आहेत. या शिवाय चीनसारख्या शेजारील देशांकडून मोठ्या प्रमाणावर भारतात उपलब्ध करून देण्यात येणारा स्वस्त माल यामुळेही एमएसएमई क्षेत्रातील अनेक उद्योग अडचणीत आले आहेत. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत, या संपूर्ण एमएसएमई क्षेत्राला शाश्वतता आणि पाठिंबा देण्याची निकड भासते आहे, हे करताना ग्रामीण आणि सूक्ष्म उद्योगांना विशेष महत्त्व देणे गरजेचे आहे. तसेच त्यांच्यासमोर सध्या असलेल्या आव्हानांचे संधींमध्ये रुपांतर करुन नवी उंची गाठण्यासाठी त्यांना सशक्त करण्याच्या दृष्टीने उपयुक्त उपाय शोधण्यासाठी त्यांना मदत करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.*

***प्रमुख शब्दः सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, आर्थिक सुधारणा, गुंतवणूक, रोजगार, उत्पादन.***

**प्रस्तावनाः**

कोणत्याही उद्योगाच्या यशस्वीतेसाठी पायाभूत सुविधा आवश्यक असतात. परंतू भारतातील एमएसएमई क्षेत्रातील बहूतांश उद्योग हे अत्यंत तोकड्या पायाभूत सुविधांच्या बळावर कार्य करीत आहेत. यावर मात करण्यासाठी सरकारने समूह विकास कार्यक्रम (क्लस्टर डेव्हलपमेंट प्रोग्रॅम) सुरू केला आहे. याद्वारे सामाईक सुविधा केंद्रे उभारली जात आहेत. या केंद्रामध्ये आधुनिक उपकरणे, तंत्रज्ञान आणि डिझाइन उपलब्ध करून दिले जात आहे. कारण एमएसएमई क्षेत्रात यश मिळवण्यासाठी कुशल मनुष्यबळ सर्वात मूलभूत घटक ठरतो. उपलब्ध मनुष्यबळ आकृष्ट करणे आणि ते कायम ठेवणे हे तर महत्वाचे आहेच परंतू नवीन कुशल मनुष्यबळ विकसीत करणे हे त्याहून जास्त महत्वाचे ठरते. ही बाब ओळखून सरकारने अनेक क्षमता विकास कार्यक्रम सुरू केले आहेत. उद्योजकता विकास कार्यक्रम आणि व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम याद्वारे सरकार देशातील युवकांचा क्षमता विकास करू इच्छित आहे.

**अभ्यासाचे महत्व आणि गरज:**

एक सशक्त औद्योगिक क्षेत्र उभारण्यास या देशातील राज्यकर्ते आणि धोरणकर्त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले आहे. उद्योगांमुळे केवळ स्थानिक गरजा

आणि निर्यातीची मागणीच भागवली जात नाही तर या क्षेत्रामुळे देशातील तरूणांना मोठया प्रमाणात रोजगार मिळतो. सखल देशाअंतर्गत उत्पादन अर्थात जीडीपी ची चर्चा होते त्यावेळी प्रामुख्याने लोह आणि पोलाद, मोटार निर्मिती आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू यासारख्या मोठ्या उद्योगांवरच भर दिला जातो. परंतू आपल्या देशात आणखी एक क्षेत्र आहे. जे उत्पादन तसेच रोजगार निर्मिती या दोन्हीही बाबतीत महत्वाचे आहे तरी सुध्दा अर्थ तज्ज्ञ आणि धोरणकर्त्यांकडून काहीसे दुर्लक्षिले जाते. आणि ते क्षेत्र म्हणजे सूक्ष्म, मध्यम आणि लघु उद्योग अर्थात एमएसएमई हे होय.

सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग यांची अर्थव्यवस्थेमध्ये खूप महत्वाची भूमिका असते. या क्षेत्राद्वारे अकूशल, अर्धकूशल आणि कुशल मनुष्यबळासाठी रोजगार निर्मिती केली जाते, ती ही अत्यंत कमी गुंतवणुकीद्वारे. या उद्योगांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही मोठा हातभार लागतो कारण या उद्योगांची उत्पादने ग्रामीण भागामध्ये तयार केली जातात. ही उत्पादने प्रामुख्याने अनोखी आणि वेगळी असल्यामुळे निर्यातीद्वारे विदेशी चलन मिळविण्यासाठी महत्वाची ठरतात. उत्पादन खर्च कमी असल्यामुळे आर्थिक अस्थिर वातावरणातही सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग टिकाव धरू शकतात.

या सर्व वैशिष्टयांमुळे सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग भारतीय अर्थव्यवस्थेला भरारी देण्याचे सामर्थ्य बाळगून आहेत. त्यांना सरकार आणि वित्तीय संस्थाकडून थोडीशी मदत मिळाल्यास हे उद्योग देशाच्या आर्थिक भरभराटीस चांगला हातभार लावू शकतात.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या सद्यस्थितीतील परीस्थितीचा आढावा घेणे.

२. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे रोजगार निर्मिती आणि अर्थव्यवस्थेतील योगदान अभ्यासणे.

३. एमएसएमई क्षेत्र बळकट करण्यासाठी योजण्यात आलेले विविध धोरणात्मक उपाय अभ्यासणे.

४. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसमोरील आव्हानाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधकाने दुय्यम स्त्रोतांचा आधार घेऊन निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला आहे. संशोधनाचा हेतु सफल होण्यासाठी माहिती संकलनाच्या विविध मार्गांचा वापर माहिती गोळा करण्यासाठी केलेला आहे. त्यामध्ये दुय्यम स्त्रोताचा वापर करुन माहिती संकलित केली आहे. यामध्ये माहिती संकलित करण्यासाठी सरकारी अहवाल, परिपत्र, दस्तऐवज, मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रातील लेख, संदर्भ पुस्तके, आंतरजाल इ. वापर करण्यात आला आहे.

**उद्योगांची व्याख्या:**

भारत सरकारने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या विकासासाठी व त्यांची स्पर्धाशक्ती वाढविण्यासाठी २००६ मध्ये 'Micro, Small and Medium Enterprises Development Act' संमत केला आहे. यामध्ये सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाच्या व्याख्या देण्यात आल्या आहेत. त्यात संबंधित उपक्रमाने यंत्रसामग्रीमध्ये अथवा उपकरणांमध्ये किती गुंतवणूक केली आहे. त्यावरून तो उद्योग, सूक्ष्म, लघु व मध्यम यापैकी कोणत्या वर्गामध्ये येतो हे निश्चित करण्यात आले आहे.

**१) सूक्ष्म उद्योग :**

"उत्पादन उद्योग असल्यास यंत्रे व संयत्रेमध्ये कमाल भांडवल गुंतवणूक रु. २५ लाख आणि सेवा उद्योग असल्यास विभिन्न उपकरणांमध्ये रु. १० लाख कमाल भांडवल गुंतवणूक असल्यास अशा उद्योगांना सूक्ष्म उद्योग असे म्हणतात."

**२) लघु उद्योग :**

"ज्या उत्पादन उद्योगाच्या यंत्रे संयंत्रे मालमत्तेमध्ये कमाल रु. ५ कोटीची भांडवली गुंतवणूक केलेली असेल आणि ज्या सेवा उद्योगामधील उपकरणांमध्ये रु. २ कोटी कमाल भांडवली गुंतवणूक असेल असे उद्योग म्हणजे लघु उद्योग होय."

**३) मध्यम उद्योग :**

"ज्या उत्पादन उद्योगाच्या यंत्रे संयंत्रांमधील कमाल भांडवल गुंतवणूक रु. १० कोटी आहे व ज्या सेवा उद्योगाच्या उपकरणांमधील गुंतवणूक कमाल रु. ५ कोटी आहे असे उद्योग म्हणजे मध्यम उद्योग होय."

| प्रकार | उत्पादन/ निर्मिती उद्योग (यंत्रसामुग्रीतील एकूण गुंतवणूक) | सेवा उद्योग (उपकरणांमधील एकूण गुंतवणूक) |
|---|---|---|
| सूक्ष्म उद्योग | रु. २५ लाखापर्यंत | रु. १० लाखापर्यंत |
| लघु उद्योग | रु. २५ लाखांवर आणि रु. ५ कोटीपर्यंत | रु. १० लाखांवर आणि रु. २ कोटीपर्यंत |
| मध्यम उद्योग | रु. ५ कोटीच्यावर आणि रु. १० कोटीपर्यंत | रु. २ कोटीच्या वर आणि ५ कोटीपर्यंत |

देशभरात असे एकूण ६५ लाख ९१ हजार ८७० उद्योग आहेत. यामध्ये १५ लाख ६३ हजार ९७४ उद्योग लघुउद्योगांतर्गत नोंदणी झालेले उद्योग, स्वयंउद्योग करारांतर्गत नोंदवलेले २१ लाख ९६ हजार ९०२ उद्योग अणि उद्योग आधार करारांतर्गत नोंदवलेले २८ लाख ३० हजार ९९४ उद्योग या सगळ्यांचा समावेश आहे. भारतासारख्या विकसनशील देशात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्र हे अर्थव्यवस्थेचा कणा आहे. औद्योगिक व आर्थिक विकासात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे योगदान अनन्यसाधारण आहे.

**रोजगार निर्मितीतील योगदान:**

अर्थव्यवस्थेत रोजगार निर्मितीमध्ये एमएसएमई महत्त्वाची भूमिका बजावते. एमएसएमई मंत्रालयाच्या मते, हे उद्योग GDP मध्ये अंदाजे ३०% योगदान देतात आणि सुमारे ११० दशलक्ष लोकांना रोजगार देतात. एमएसएमई मध्ये मोठ्या उद्योगांच्या तुलनेत अधिक नोकऱ्या निर्माण करण्याची क्षमता आहे कारण त्यांना कमी भांडवली गुंतवणूक आवश्यक आहे आणि रोजगाराची तीव्रता जास्त आहे. यशस्वी एमएसएमईच्या अभ्यासावरून असे दिसून आले आहे की, या उपक्रमांचा रोजगार निर्मितीवर महत्त्वपूर्ण परिणाम होऊ शकतो. उदाहरणार्थ, गुजरातमधील अमूल डेअरी कोऑपरेटिव्ह, जी १९४० च्या दशकात एक लहान सहकारी संस्था म्हणून सुरू झाली होती, ती एक यशस्वी एमएसएमई बनली आहे आणि आज १.६ दशलक्षाहून अधिक लोकांना रोजगार देते, कुशल आणि अकुशल कामगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतात.

वर्ष २००६-०७ च्या संदर्भावर आधारीत २००९ सालापर्यंतची माहिती गोळा करुन २०११-१२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या चौथ्या अखिल भारतीय जनगणनेनुसार तसेच केंद्रीय सांख्यिकी संघटनेने केलेल्या आर्थिक मुद्यांवर आधारीत जनगणना २००५ मधल्या आकडेवारीनुसार या उद्योगांनी सुमारे ८ कोटी ५

लाख इतकी रोजगार निर्मिती केली. देशातली उद्योगांची संघटना, भारतीय उद्योग संघाने काढलेल्या आकडेवारी नुसार या उद्योगांमुळे सुमारे १२ कोटी व्यक्तींना रोजगार उपलब्ध झाला.

**अर्थव्यवस्थेतले योगदान:**

भारत सरकारचे संख्याशास्त्रीय माहितीचे भंडार असलेले जे केंद्रीय सांख्यिकी कार्यालय आहे. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे २०१३-१४, २०१४-१५ आणि २०१५-१६ या वर्षांमधे देशाच्या मूल्यवर्धनामधले योगदान अनुक्रमे ३२.२६%, ३१.८६% आणि ३१. ६% आहे आणि त्यांचे देशाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातले २०१३-१४, २०१४-१५ आणि २०१५-१६ या वर्षांमधे योगदान अनुक्रमे २९.७६%, २९.३९% आणि २८.७७% टक्के राहिले आहे.

**एमएसएमई क्षेत्र बळकट करण्यासाठी योजण्यात आलेले विविध धोरणात्मक उपाय:**

एमएसएमई क्षेत्राच्या वाढीसाठी खूप वाव व क्षमता असण्याबरोबरच या क्षेत्रासमोर अनेक आव्हाने आहेत. यामध्ये प्रामुख्याने लघुउद्योजकांना वेळेवर कर्ज न मिळणे, पायाभूत सोयीसुविधांसह प्रगत तंत्राचा अभाव, बाजारपेठेपर्यंत उत्पादन पोहचण्यातील अडथळे आणि कुशल मनुष्यबळाची कमतरता इ.चा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. याशिवाय, चीन, इंडोनेशिया, आणि थायलंड यासारख्या शेजारील राष्ट्रांकडून वाढत असलेल्या स्पर्धेमुळे आपल्या देशातील एमएसएमई क्षेत्राचा जागतिक स्तरावरील स्पर्धात्मकतेत टिकाव लागण्यासाठी मजबूत धोरणे स्वीकारणे आवश्यक झाले आहे. यादृष्टीने प्रमुख आव्हानांवर उपाययोजना करताना या क्षेत्राचा सर्वांगिण विकास होईल यासाठी केंद्र शासनाने 'मेक इन इंडिया', 'डिजिटल इंडिया', 'स्टार्ट-अप इंडिया' आणि 'स्किल इंडिया' यासारखे नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाचा दर सद्यस्थितीत १६-१७ टक्के आहे. २०२२ पर्यंत एमएसएमई क्षेत्राची उत्पादकतेत वाढ करून देशाचा जीडीपीचा दर २५ टक्क्यांपर्यंत नेण्यासह या क्षेत्रात १०० कोटी नवीन रोजगारसंधी उपलब्ध करून देण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.

**सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग: एक दृष्टिक्षेप:**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्र सहा कोटींहून अधिक उद्योगांसह भारतीय अर्थव्यवस्थेचे एक अत्यंत उत्साही आणि गतिमान क्षेत्र म्हणून उदयास आले आहे. व्यावसायिकतेला प्रोत्साहन देणाऱ्या या क्षेत्राचा कृषी क्षेत्राखालोखाल क्रमांक लागतो. तुलनेने कमी भांडवली खर्चात हे क्षेत्र उद्योजकता आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करत आहे. खादी, ग्राम आणि कॉयर उद्योगासह इतर उद्योगांना हे मंत्रालय चालना देत आहे. पतपुरवठा सहाय्य, तांत्रिक सहाय्य, पायाभूत सुविधा विकास, कौशल्य विकास आणि प्रशिक्षण, स्पर्धात्मकता आणि बाजारपेठ वाढवणे यासाठी विविध योजना/ कार्यक्रमांची अंमलबजावणी हे मंत्रालय करते.

**उद्यमी भारत:**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एमएसएमई क्षेत्रासाठी ३० जून २०२२ रोजी नवी दिल्लीच्या विज्ञान भवन येथे आयोजित 'उद्यमी भारत' कार्यक्रमात प्रमुख उपक्रम सुरू केले. एमएसएमई क्षेत्राचा विकासासाठी केलेल्या प्रयत्नांना मान्यता देण्यासाठी एमएसएमई, राज्ये/ केंद्रशासित प्रदेश, आकांक्षी जिल्हे आणि बँकांना 'राष्ट्रीय एमएसएमई पुरस्कार, २०२२' हा पुरस्कार देण्यात आला. पंतप्रधानांनी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची कामगिरी वाढविणारी आणि गतिमान

करणारी रॅम्प योजना, पहिल्यांदा निर्यात करणाऱ्या एमएसएमई निर्यातदारांची क्षमता वाढवणारी सीबीएफटीइ योजना आणि नवीन पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (पीएमइजीपी) यांचा आरंभ त्यांनी केला.

**धोरणात्मक उपक्रम:**

प्रकल्प गुंतवणूक, यंत्रसामग्री किंवा उपकरणे आणि उलाढाल यावर एमएसएमईची सुधारित व्याख्या आधारित आहे. तिचा अवलंब केल्यानंतर १ जुलै २०२० रोजी उद्यम नोंदणी पोर्टल सुरू करण्यात आले. हे पोर्टल पूर्णपणे ऑनलाइन, मोफत, त्रासमुक्त, कागदविरहीत आहे. एमएसएमईसाठी व्यवसाय सुलभ करण्याच्या दिशेने टाकलेले हे एक पाऊल आहे. या पोर्टलवर २ ऑगस्ट २०२२ रोजी १ कोटीची नोंदणी झाली. २२ डिसेंबर २०२२ पर्यंत या पोर्टलवर १.२८ कोटीपेक्षा जास्त नोंदणी झाली.

**एमएसएमईसाठी राष्ट्रीय मंडळ:**

केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या राष्ट्रीय मंडळाची १७ वी बैठक २३ मार्च २०२२ रोजी नवी दिल्लीच्या इंडिया हॅबिटॅट सेंटर येथे आणि १८ वी बैठक १४ सप्टेंबर २०२२ रोजी नवी दिल्लीच्या विज्ञान भवन येथे झाली. त्यात एमएसएमई क्षेत्राला बळकटी देण्यासाठी चर्चा करण्यात आली.

**भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा (आयआयटीएफ), २०२२:**

केंद्रीय मएसएमई मंत्र्यांनी ४१ व्या भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्यात एमएसएमई पॅव्हेलियनचे उद्घाटन केले. इंडिया ट्रेड प्रमोशन ऑर्गनायझेशन (आयटीपीओ) ने १४ ते २७ नोव्हेंबर दरम्यान हा मेळावा आयोजित केला. वोकल फॉर लोकल, लोकल टू ग्लोबल या संकल्पनेअंतर्गत २४ राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमधून सहभागी होणार्याह सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना २०४ स्टॉल्सचे वाटप करण्यात आले. एमएसएमई पॅव्हेलियनमध्ये महिलांच्या मालकीच्या उद्योगांचा आतापर्यंतचा सर्वाधिक सहभाग होता.

अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती मध्ये सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचा प्रचार आणि ईशान्य भागात राष्ट्रीय अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती हब (एनएसएसएच) या योजनेचा उद्देश अनुसूचित जाती/जमातींमधील उद्योजकतेला चालना देणे आहे. केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांद्वारे केंद्र सरकारच्या खरेदी आदेश धोरणाची ४% पूर्तता करणे आणि अनुसूचित जाती/जमातींमधील उद्योजकतेला चालना देण्याचं काम हे हब करतात.

**परिषदा/शिखर परिषदा:**

एमएसएमई-विकास संस्था, चाचणी केंद्रे आणि तंत्रज्ञान केंद्रे यांची राष्ट्रीय परिषद १० मे २०२२ रोजी एमएसएम मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. एमएसएमईच्या फायद्यासाठी राज्य सरकारे आणि इतर भागधारकांसह योजनांची उत्तम अंमलबजावणी तसेच देखरेख आणि समन्वयासाठी भविष्यातील योजना या विषयावर या परिषदेत चर्चा झाली. 'आंतरराष्ट्रीय सहकार्य' योजनेअंतर्गत मंत्रालयाने नवी दिल्लीत शिखर परिषदेचे आयोजन केले होते.

भारताच्या आर्थिक विकासात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्राला धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे मानले जाते. भारतात जवळपास ९० टक्के उद्योग या क्षेत्राशी संबंधित असून देशातील एकूण कामगार वर्गापैकी ४० टक्के लोकांना हे क्षेत्र रोजगार देते. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांत पारंपारिक उत्पादनांपासून आजच्या नूतन तंत्रज्ञानाशी संबंधित सर्व प्रकारच्या ८००० पेक्षाही जास्त वस्तू व सेवांचे उत्पादन घेतले जाते. २०२५ या भारतीय अर्थव्यवस्था ५ ट्रिलिअन डॉलरपर्यंत मजल मारेल, असा निष्कर्ष मांडण्यात आला आहे. त्यामुळे येत्या काळातही लघु व मध्यम उद्योगक्षेत्राला अनन्यसाधारण महत्व राहिल. त्यादृष्टीने या क्षेत्राच्या

सर्वांगिण विकासाबरोबर हे क्षेत्र आर्थिकदृष्ट्या अधिकाधिक बळकट होण्यासाठी योग्य धोरणे राबवणे व नवनव्या योजना व कार्यक्रम आखणे इ. वर सरकारचा अधिक भर आहे. किंबहुना या क्षेत्राच्या सशक्तीकरणासाठी सरकार प्राधान्यक्रमाने पावले उचलते आहे. उदाहरणार्थ, २०१६ च्या वार्षिक अर्थसंकल्पात ३४६५ कोटी रूपयांचा निधी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्रासाठी मंजूर करण्यात आला होता. यावर्षीच्या अर्थसंकल्पात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी सर्वाधिक म्हणजे ६४८२ कोटी रूपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

**एमएसएमईंसमोरील आव्हाने:**

एमएसएमईंना त्यांचे व्यवसाय चालवताना विविध आव्हानांचा सामना करावा लागतो, त्यापैकी काही खालीलप्रमाणे आहेत:

- **वित्तपुरवठ्याचा मर्यादित प्रवेश:** एमएसएमईसाठी वित्त प्रवेश हे एक मोठे आव्हान आहे, कारण त्यांच्याकडे सहसा संपार्श्विक आणि क्रेडिट इतिहासाचा अभाव असतो. त्यामुळे त्यांना वित्तीय संस्थांकडून कर्ज मिळणे कठीण होते.
- **कुशल कामगारांचा अभाव:** एमएसएमईंना कुशल कामगारांच्या कमतरतेचा सामना करावा लागतो, ज्यामुळे त्यांची उत्पादकता आणि वाढ प्रभावित होते.
- **अपुऱ्या पायाभूत सुविधा:** एमएसएमई सहसा अशा भागात काम करतात जेथे पायाभूत सुविधा अपुरी असतात, जसे की खराब रस्ते जोडणी, वीज पुरवठ्याचा अभाव आणि अपुरा पाणीपुरवठा, ज्यामुळे त्यांची कार्यक्षमता आणि उत्पादकता प्रभावित होते.
- **मोठ्या उद्योगांकडून स्पर्धा:** एमएसएमईंना मोठ्या उद्योगांकडून कठोर स्पर्धेचा सामना करावा लागतो ज्यांच्याकडे अधिक संसाधने आणि मोठ्या प्रमाणावर अर्थव्यवस्था आहेत.
- **तांत्रिक अप्रचलितता:** एमएसएमईकडे त्यांचे तंत्रज्ञान अपग्रेड करण्यासाठी संसाधनांचा अभाव असतो, ज्यामुळे त्यांची उत्पादकता आणि कार्यक्षमतेवर परिणाम होतो.
- **नियामक अनुपालन:** एमएसएमईंना अनेक नियामक अनुपालन आवश्यकतांचा सामना करावा लागतो, जसे की कर, परवाने आणि परवाने, जे वेळखाऊ आणि महाग असू शकतात.
- **पुरवठा साखळीतील व्यत्यय:** एमएसएमई अनेकदा काही पुरवठादारांवर अवलंबून असतात, ज्यामुळे पुरवठा साखळीत व्यत्यय येऊ शकतो आणि त्यांच्या कामकाजावर परिणाम होऊ शकतो.

**सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या समस्येवरील उपाययोजना:**

केंद्र सरकार व राज्य सरकारने या उद्योगांच्या विकासासाठी नेहमीच प्रोत्साहनात्मक धोरण राबविले आहे. विविध संस्थांच्या उदा. निसबुड, लघुउद्योग विकास संस्था, भारतीय लघु उद्योग विकास बँक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, जिल्हा उद्योग केंद्रे इ. अशा अनेक संस्था व महामंडळाच्या माध्यमातून सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या समस्येवर उपाययोजना केल्या जातात, मदत केली जाते. तरीही या उद्योगक्षेत्राचे प्रश्न, समस्या ह्या गंभीर होत चालल्या आहेत. त्यावर प्रामुख्याने खालीलप्रमाणे उपाययोजना करता येतील.

- **सुलभ भांडवलपुरवठा:** सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना बँका व वित्तीय संस्थाकडून आवश्यक तेवढा व नियमित वित्तपुरवठा होणे गरजेचे आहे. आजही लालफितीचा कारभार व भ्रष्टाचार यामुळे कर्जप्रकरणे अडवली जातात.

उद्योजक मेटाकुटीस येतात. यावर सक्षम उपाययोजना होणे गरजेचे आहे. सुलभ व नियमित भांडवल पुरवठा होणे गरजेचे आहे.

- **नियमित विजपुरवठा:** भारनियमनाची समस्या या उद्योगांना मारक ठरते. त्यामुळे नियमित व पुरेसा विजपुरवठा सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना होणे गरजेचे आहे.
- **कच्च्या मालाचा नियमित पुरवठा:** सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना कच्च्या मालाचा नियमित पुरवठा होणे गरजेचे आहे. साठेबाजी, मध्यस्थांचे गैरव्यवहार, गुदामांची सोय नसणे इ. समस्या दूर होण्याकरिता शासनाने ठोस पावले उचलणे आवश्यक आहे.
- **प्रशिक्षणाची सोय:** लघु व मध्यम उद्योजकांना उद्योजकीय प्रशिक्षण कार्यक्रम राबवून त्याद्वारे प्रकल्प, उत्पादन, विपणन, लेखाकर्म, व्यवस्थापन याबाबतचे दर्जेदार प्रशिक्षण देणे ही काळाची गरज बनली आहे. महिला उद्योजक व तरूण विद्यार्थीवर्गास प्रशिक्षणाची सोय उपलब्ध होणे आवश्यक आहे.
- **तंत्रज्ञान व जाहिरात:** या उद्योगांनी काही प्रमाणात का होईना पण आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने मदत करावी. तसेच वस्तूंचे मार्केटिंग, जाहिरात, पॅकेजिंग याबाबतीतही सुधारणा होणे गरजेचे आहे.
- **पुनर्वित्त पुरवठा:** विविध वित्तीय संस्था व बँका ह्या लघु व मध्यम उद्योगांना अर्थपुरवठा करतात. अशा वित्तीय संस्था व बँकाना शासनाने पुनर्वित्त पुरवठा करावा. भारतीय लघुउद्योग विकास बँक पुनर्वित्तपुरवठा करते मात्र त्याची व्याप्ती वाढविणे गरजेचे आहे.
- **समन्वय:** उद्योजकता विकासास मदत करणाऱ्या अनेक संस्थांचे जाळे निर्माण करण्यात आले आहे. मात्र या संस्था, मंडळे, बँका व शासन व सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजक यांच्यात समन्वय निर्माण होणे गरजेचे आहे.
- **एक खिडकी योजना:** सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या नोंदणी, वित्तपुरवठा, परवाने सुविधांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी संपर्क साधावा लागतो. त्याऐवजी या उद्योजकांस सर्व माहिती व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने एक खिडकी योजना राबविणे गरजेचे आहे.
- **आजारी उद्योगांचे पुनर्वसन:** जे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग आजारी पडले आहेत अशा उद्योगांचे प्राधान्याने पुनर्वसन होणे गरजेचे आहे. शासनाने तसेच विविध उद्योजकीय संस्थांनी याबाबत समन्वयाने व तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे.

अशा अनेक उपाययोजनांची नितांत व तातडीची गरज निर्माण झाली आहे.

जागतिक स्तरावर सर्वच देशांत सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्र अर्थात मायक्रो, स्मॉल व मिडियम एंटरप्राइझेस सेक्टर (एमएसएमई) सकल घरगुती उत्पादनात - (Gross Domestic Product -GDP) मोठे योगदान देते. तसेच देशांच्या आर्थिक वाढीतही हे क्षेत्र महत्वाची भूमिका बजावते. सर्वसामान्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याबरोबरच उद्योजकता आणि नावीन्यपूर्ण उद्योग कल्पनांना चालना देण्यात या क्षेत्राचा महत्वाचा वाटा आहे. देशातील मोठ्या उद्योगांच्या व्यावसायिक गरजा पूर्ण करण्यासाठी पूरक सहयोगी क्षेत्र म्हणूनही सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्राकडे पाहिले जाते. एकूणच देशातील सामाजिक-आर्थिक सर्वांगिण विकासात एमएसएमईजचा मोलाचा वाटा आहे.

## निष्कर्ष :

अर्थव्यवस्थेत रोजगार निर्मितीमध्ये एमएसएमई महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. शेतीनंतरचे ते सर्वात मोठे रोजगार आणि देशाच्या आर्थिक विकासात योगदान देणारे क्षेत्र आहे. रोजगार निर्मितीवर एमएसएमईचा प्रभाव महत्त्वपूर्ण आहे, कारण ते विविध कौशल्य स्तरांवर आणि विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी प्रदान करतात. एमएसएमईच्या वाढीचा थेट परिणाम रोजगार निर्मितीवर होतो आणि त्यांचे यश अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी आवश्यक आहे. तथापि, एमएसएमईंना रोजगार निर्माण करण्यात अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. या आव्हानांमध्ये वित्तपुरवठ्याचा मर्यादित प्रवेश, कुशल मनुष्यबळाचा अभाव, कालबाह्य तंत्रज्ञान, अपुरी पायाभूत सुविधा, मोठ्या उद्योगांमधील स्पर्धा, पुरवठा साखळीतील व्यत्यय, बाजारपेठेतील प्रवेश आणि नियामक अनुपालन समस्या यांचा समावेश आहे. ही आव्हाने कोविड-19 साथीच्या आजारामुळे वाढली आहेत, ज्याचा एमएसएमई क्षेत्रावर गंभीर परिणाम झाला आहे. परिणामी अनेकांनी रोजगार गमाविला आणि अनेक व्यवसाय बंद झाले. या आव्हानांना तोंड देण्यासाठी, सरकारने एमएसएमईंना समर्थन आणि प्रोत्साहन देण्यासाठी 'आत्मनिर्भर भारत' अभियानासारख्या विविध योजना आणि उपाययोजना सुरू केल्या आहेत. या उपायांचे उद्दिष्ट आर्थिक सहाय्य, तंत्रज्ञान अपग्रेडेशन, विपणन समर्थन आणि व्यवसाय करणे सोपे आहे. या आव्हानांना तोंड देऊन, एमएसएमई क्षेत्र रोजगार निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते आणि देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते.

## संदर्भ:

१. Datta, Sundharam, Indian Economy (2015); S. Chand Ppublishing, New Delhi
२. Mistra, Puri, Indian Economy (2015), Himalaya publishing House, Mumbai
३. Handbook of statistics on the Indian Economy 2021-22.
४. चव्हाण एन. एल., भारतीय अर्थव्यवस्था(२०१५), प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
५. योजना मासिक, नोव्हेंबर २०१७
६. http://di.maharashtra.gov.in
७. https://pib.gov.in
८. https://plan.maharashtra.gov.in
९. www.encyclopedia.com
१०. www.mr.wikipedia.org